**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.48612, OCT- NOV 2017, VOL- 4/24*

# लिंगभाव असमानता आणि सामाजिक विकास

**सुजाता कराडे, Ph. D.**

*सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख, समाजशास्त्र श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, रतनशीनगर, सांगली.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

स्त्री व पुरुष हे समाजव्यवस्थेचे घटक असून जे आपापली भूमिका पार पाडत असतात ही भूमिका समाजव्यवस्थेने दिलेल्या लिंगभावानुसार पार पाडली जाते. या दोन्ही भूमिकांचा परस्पर पूरकतेवर प्रत्येक राष्ट्र, समाज, कुटुंबाचे अस्तित्व व व प्रगती अवलंबून असते. भारतीय समाजव्यवस्था ही पुरुषप्रधान व्यवस्था आहे. पुरुषांना केंद्रस्थानी मानणारी भारतीय संस्कृती वर्षानुवर्षे चालत आलेली आहे. अशा पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे शोषण पूर्वीपासून ते आज अखेरपर्यंत होत असल्याचे दिसते. "लैंगिक असमानता हा मानवी अधिकार किंवा सामाजिक न्यायामधील महत्त्वाचा विषय आहे. कारण समाजव्यवस्थेतील अर्धा साधनांचे प्रतिनिधित्व स्त्रीकडे येथे याच बरोबर समाजाच्या विकासाची जबाबदारी जशी पुरुषाची आहे तर शेती स्त्रियांचाही आहे." असे असले तरी प्रत्येक समाज हा स्त्रीशक्ती कडे दुर्लक्ष करीत आहे.

लिंग भागानुसार स्त्रियांना दुय्यमत्त्व का व कसे आले याचे विश्लेषण केले तरी विषमतेला अनुसरून असणारे समाजरचनेत लिंगभाव हे स्त्री-पुरुषांच्या देह पातळीनुसार भिन्न आहेत. त्यामुळे हे दिसून येते त्यांचे रूपांतर सामाजिक करण्याच्या प्रक्रियेतून भिन्न आहेत ही असमानता सामाजिक मांडली जाऊन स्त्रीला समाजजीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये अर्थात स्त्री परंपरा संस्कृती, धर्म, जात, राज्यसंस्था, श्रमविभागणी लैंगिकता अशा घटकांमध्ये तिचे स्थान दुय्यम मानले गेले आहे. विषमता बाईपणाची निगडीत न राहता सामाजिक परिस्थितीशी निगडित आहे हे पुरुषप्रधान व्यवस्थेमध्ये एकाच समाजातल्या विविध वर्गात वेगवेगळ्या रूपात दिसते. इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यावर ही पुरुषप्रधानता फेगडे रुपये घेताना दिसते पण मूळ गाभा मात्र तोच असतो उदाहरण पुरुषाच्या हातातील नियंत्रण, नियंत्रणाचे स्वरूप बदलू शकते. उच्चवर्णीय स्त्रियांपेक्षा आदिवासी समाजातील स्त्रियांना पुरुषप्रधानता वेगवेगळ्या प्रकारे जाणवते. "भारतीय अमेरिकन स्त्रियांचे पुरुषप्रधानाबाबतचे अनुभव वेगवेगळे असतात. पुरुष प्रधानता कशा प्रकारे राबविली जाते किंवा यासाठी वापरल्या जाणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक चालीरीती वेगवेगळे असतात. ते वेगवेगळ्या समाजाचा व इतिहासाच्या वेगवेगळ्या कालखंडाचा अभ्यास केल्यास लक्षात येते."

मानवी इतिहासात 'व्यक्ती', 'गट' किंवा वर्ग ही सत्तेची केंद्रे राहिली असली तरी या सर्वांचे स्वरूप हे पुरुष प्रभुत्वावरच राहिलेले आहे. "म्हणूनच झिला असनस्टाईन यांनी वर्गावर आधारित सत्तेचा सिद्धांताची तांगड लिंगावर आधारित सत्तेच्या सिद्धांताशी घालण्याची निकड प्रतिदिन केली आहे." यानुसार विचार केला तर स्त्रियांच्या कडे पाहताना लिंगभेद धातु निर्माण होणाऱ्या विषमतेनुसार त्यानुसार पाहिले जाते.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

**लिंगभाव व समाज**

भारतातील ज्या ज्या सामाजिक समस्या आहेत त्या त्या सामाजिक समस्येचे मूळ श्रेष्ठ-कनिष्ठ मानवांच्या घटकांवर अवलंबून आहे. या सर्वांचा आधार मानवानी निर्माण केलेल्या सामाजिक समस्यांवर आधारित असला तरी नेसर्गिकतेवर आधारित लिंगभाव भेद करण्याचा हा प्रकार प्राचीन मानवी समाजापासून ते आज अखेरच्या समाजजीवनापर्यंत चालत आलेला आहे. पण तो या लिंगभाव भेदातून दिसून येतो. यातून आजही स्त्रियांचे सुटका झालेली नाही व्यक्तीच्या दर्जा या दृष्टीने विचार केला तर स्त्रीला मिळालेला दर्जा व मिळविलेला दर्जा असे दोन प्रकार पडतात त्यामध्ये मिळालेला दर्जा हा प्राप्त होतो यामध्ये विशेष करून जन्माने लिंगभाव भेदाच्या आधारे स्त्री व पुरुष असा जो दर्जा प्राप्त होतो यामध्ये स्त्रीचा दर्जा नेहमीच लिंगानुसार गौण ठरवण्यात आलेला आहे. त्यामध्ये सामाजिक दर्जानुसार स्त्रियांच्यावर सतत वर्चस्व प्रस्थापित होऊन सामाजिक, आर्थिक, धार्मिक बंधने घालून तिचे जीवन जखडून टाकले, तिने समाजात नेहमी दुय्यम राहून सेवा करावी व सर्वांना सहकार्य करत रहावे अशी समाजाची प्रवृत्ती आहे एकंदरीत स्त्रियांची एकूण स्थिती अतिशय दयनीय आहे. तिला अनेक समाजिक बंधनांना सामोरे जाऊन जीवन जगावे लागते. एकूणच स्त्री जीवनाचा विचार करताना वैदिक काळापासून ते आजपर्यंत प्रतीच्या जीवनामध्ये विशेषतः दर्जा मध्ये बदल होत गेले हे जरी खरे असले तरी स्त्रियांच्या दुय्यमतेचे कारण शरीररचना असून लिंग व लिंगभावमध्ये आहे. लिंग हे नैसर्गिक असते ते जीवशास्त्रीय आहे. लिंगभाव ही संकल्पना सर्वप्रथम स्त्री ज्येष्ठ विचारवंत अन ओकले यांनी मांडली म्हणतात, "लिंग भाव ही एक सांस्कृतिक बाब आहे. त्यातून स्त्री व पुरुषांची बाईपणात व पुरुषपणात होणारे सामाजिक वर्गवारी सूचित करते" त्यामुळे समाजात लिंगभाव हा सांस्कृतिक व सामाजिक असून तो मनुष्यनिर्मित आहे. त्यामुळे समाजाने स्त्रियांना कसे जगावे याचा कृतीकार्यक्रम ही लिंगभावानुसार दिले असून तिची भूमिका व दर्जा हा स्थल, काल व समाजपरत्वे आहे.

**लिंगभाव व विकास**

भारत हा देश विकासाकडे झुकत असताना विकासाच्या प्रक्रियेमध्ये स्त्रीयांच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. भारतीय राज्य घटनेने स्त्रियांना समानतेचा मूलभूत हक्क दिलेला आहे. हा हक्क म्हणजे स्त्रियांच्या विकासाचा पाया आहे. स्त्रियांच्या हक्काची तरतूद हे कायदेशीर आहे. तेव्हा स्त्री विकासाकडे पाहताना "पुरुषप्रधान समाजात विकासाच्या संकल्पना आणि त्यांच्या कार्यपद्धतीत मूलगामी परिवर्तन आवश्यक आहे." त्यामुळे स्त्रियांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक यातून विकास हा अभिप्रेत असला तरी विकास हा स्वातंत्र्य, समता व सामाजिक न्याय या मूल्यांची निगडित ठेवून विकासाच्या धोरणांमध्ये स्त्रियांचे योगदान महत्त्वाचे मानले गेले. 1975 खाली विणा मुजूमदार यांनी सादर केलेल्या अहवालानुसार स्त्रियांबाबत जा दृष्टिकोण कल्याणकारी असावा असे मत स्त्रीवादी चळवळ इथून येऊ लागला. स्त्रियांच्या बाबतीत सर्व प्रकारचे भेदभाव करण्यास संबंधित संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेत ने 1979 मध्ये ठराव संमत केला त्यानुसार" 1994 मध्ये महिला धोरण तयार करण्यात आले, त्यामध्ये महाराष्ट्र हे भारतातील पहिले राज्य आहे. महिला विकाससंबंधी अनेक उपाययोजना करण्यात आल्या." या योजनेतून महिलांना केंद्रस्थानी मानून विविध योजना आणि कार्यक्रम राबविण्यात येऊ लागले. महिला विकास मंत्री

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

सामूहिक क्रियाशीलता हे उद्दिष्ट ठेवून महिला विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्राथमिक उद्देशांने स्त्रियांना निर्णय घेण्याची संधी देण्यात आली. स्त्रियांना विकासाची कामे देऊन विकासामध्ये स्त्रियांचा सहभाग वाढविण्यात आला असे असले तरी संयुक्त राष्ट्रसंघाच्या 1991च्या अहवालातील युनोचे तत्कालीन सचिव पेझ्रेर डी. कुलरली आली लिहिले आहे, या माहितीतून व निर्देशांकातून हे स्पष्ट होते की, गेल्या वीस वर्षात जरी स्त्रीविषयक काही सुधारणा झाल्या असल्या तरी बहुतांश शास्त्रीय आजही सत्ता, संपत्ती, संधी याबाबतीत पुरुषाच्या मागे आहेत" त्यामुळे स्त्रियांना विकासामध्ये जास्तीत जास्त सहभागी न करतात लिंग भावानुसार वंचित ठेवण्यात येऊन सामाजिक विकासापासून दूर ठेवले जाते.

सामाजिक विकासाचा अर्थ पाहताना आर्थिक शैक्षणिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक हे घटक लिंगभावाचा विचारसरणीमध्ये दिसून येतात हे पाहणे गरजेचे आहे. कारण स्त्री-पुरुषाचा विकास हात सामाजिक विकासाचे मानले असले तरी प्रचलित समाजव्यवस्थेची चौकट आहे तशीच ठेवून विकासाकडे पाहिले जाते. आज हे पुरुष प्रधान समाज व्यवस्थेमध्ये असते या सामाजिक विकासाच्या प्रवाहातून बाजूला फेकले जात आहेत.

**आर्थिक विकासातून सामाजिक विकास आणि लिंगभाव असमानता**

आर्थिक सहाय्यता मिळवण्यासाठी क्षमता असेल व परिपूर्ण असेल तर त्या व्यक्ती स्वावलंबी होतात. त्यामुळे 'स्व' प्रगतीचा, कुटुंबाचा व व समाजाचा विकास व्हायचा असेल तर स्त्रियांच्या आर्थिक विकासामध्ये सहभाग वाढवला पाहिजे. पुरुषप्रधान समाजव्यवस्थेतील संस्कृतीमध्ये अर्थार्जन व संरक्षणाची जबाबदारी जशी पुरुषाची आहे तशी स्त्रियांची आहे हे ओळखून स्त्री सक्षमीकरण यासाठी आर्थिक निर्भयता असणे गरजेचे आहे जेव्हा स्त्रियांच्या दारिद्याचे निराकरण होणे, स्त्रियांचा आर्थिक दर्जा सुधारणे, स्त्रीचे समाजातील स्थान बदलणे गरजेचे आहे याकरिता प्रयत्न आहेत. उत्पादन प्रक्रियेतील स्त्री-पुरुषाचे संबंध सामाजिक व्यवहारातून व्हावेत याकरिता स्त्रियांचे श्रम हे दुय्यम न ठरविता ते श्रम समता पूर्ण असले पाहिजे. अशी विचारणं समाजातील काही घटकांना मध्ये निर्माण होऊ लागली. स्त्रियांचे घर काम आणि आर्थिक कामाचे योग्य मूल्यमापन व्हावे, आर्थिक साधनांवर स्त्रियांचा हक्क असावा, स्त्रियांचे संपत्तीतील अधिकार कायम रहावेत, असंघटित क्षेत्रात स्त्रियांना मिळणारी सुरक्षितता ही संघटित स्त्रियांनाही मिळावी, किमान वेतनाची हमी समाज कामासाठी स्त्रियांना समान वेतन द्यावे, स्वयंरोजगार करणाऱ्या व घरगुती काम करणाऱ्या स्त्रियांना मान्यता देणे, स्त्रियांनी अर्थार्जन करून स्वतःची संपत्ती निर्माण करण्यासाठी शासनाने सक्रीय व्हावे म्हणून, "प्रत्येक जिल्ह्यामध्ये आर्थिक महामंडळाची स्थापना 24 फेब्रुवारी 1975 रोजी वरून या महामंडळामार्फत स्त्रीयांना कौशल्यपूर्ण व क्षमता पूरक प्रशिक्षण व व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देण्यात येते." आर्थिक विकासामध्ये स्त्रियांचा सहभाग हा महत्त्वाचा मानला असला तरी लिंगभेदावर आधारित श्रम रचनाही श्रमाच्या बाजारपेठेत दिसून येते कारण आजही स्त्रिया ज्या ज्या क्षेत्रात काम करतात तेथे त्यांना कमी कौशल्याच्या व कमी पगाराच्या कामांमध्ये प्रवेश दिला जातो अर्थात लिंगभेदावर आधारलेली श्रमविभागणी आजही वेगवेगळ्या रूपात दिसून येते, " विमान चालक का पासून ते रेल्वे इंजिन झालं का पर्यंत अभियांत्रिकी पासून वैद्यक क्षेत्रातील कामात पर्यंत आणि अधिकार यापासून सनदी सेवेतील पदापर्यंत सर्व क्षेत्रात स्त्रियांनी आपली पात्रता सिद्ध केलेली

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*

आहे." पण कोणत्या क्रिया कोणते काम करण्यास योग्य आहेत हे त्यांच्या क्षमतेनुसार ठरवले जाते तसेच सर्व क्षेत्रात अग्रेसर असल्या तरी आर्थिक त्याची चौकट ही लिंगभाव, जात व वर्ग यानुसार ठरविले जाते त्यामुळे सामाजिक विकासामध्ये सर्वात समाजातील स्त्रियांचे योगदान असू शकत नाही.

"आज-काल विविध क्षेत्रामध्ये उत्पादन खर्च, उत्पादनक्षमता व कार्यक्षमता यांचा संबंध जोडला जात असल्याकारणाने स्त्रियांच्या श्रमाच्या बाबतीत अधिक शोषण होते." हे शोषण लिंगभाव या दृष्टीने होऊन सामाजिक भेदभाव वाढीस लागतो. कारण लिंगभेदाचा विचार केला तर सामाजिक जीवनाशी संबंधित असता स्त्रियांचे कार्यपद्धती व निर्णय घेण्याची क्षमता ही आर्थिक कार्यशक्ती देणारी ठरली असली तरी सर्व निर्णय व स्त्रियांनी केलेले कार्य करावे हे ठरविण्याचे अधिकार पुरुषांना आहे. उदाहरणार्थ बचत गटाच्या माध्यमातून स्त्रियांच्या आर्थिक सबलीकरण महत्त्वाचे मानले गेले. बचत गटातून स्त्रियांनी व्यवसाय करावे याकरिता क्रियांचे बचत गट निर्माण होऊ लागले. पण त्या स्त्रीने बचत गटातून काय करावे व काय करू नये हे निर्णय त्या कुटुंबातील पुरुष व्यक्ती घेऊ लागले. एकंदरीत पाहता आजही स्त्रियांच्या बाबतीत निर्णय हे पुरुष घेऊ लागले आहेत तसेच स्त्रियांच्या श्रमशक्ती वर पुरुषांचे नियंत्रण आहे. स्त्री-पुरुष यावर आधारलेले कुटुंब दर्जा व भूमिका यातून घरातील काम व घराबाहेर चे काम या दोन्ही घटकांमध्ये लक्ष दिले तर घरामध्ये व घराबाहेर स्त्रियांचे स्थान लिंग भावानुसार दुय्यम मानले जाते. कारण यात सामाजिक संरचना की दृढ झालेली आहे.

**शैक्षणिक विकासातून सामाजिक विकास आणि लिंगभाव असमानता**

सामाजिक विकासाकरिता स्त्रियांना ज्ञान व कौशल्य या व्यक्तिगत गुणांची आवश्यकता असते हे गुण स्त्रीला मिळविण्यासाठी शिक्षणाची गरज आहे. समाजाच्या विकासासाठी स्त्री शिकली पाहिजे याकरिता ब्रिटिश काळामध्ये महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे व इतर समाजसुधारकांनी स्त्री शिक्षणात महत्त्व दिले या सुधारकांच्या मध्ये एक स्त्री शिकली तर तिचे कुटुंब सुधारते त्यानंतर समाज सुधारक या कारणास्तव त्यांनी स्त्री सबलीकरणाचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

प्रत्येक देशात शिक्षण हे व्यक्तीचा मूलभूत हक्क मानला आहे शिक्षणामुळे मानवाचा विकास होतो हे अनेक विचारवंतांनी सिद्ध केले आहे कारण स्वतःच्या जीवन सुखी व समृद्ध करावयाचे असेल तर शिक्षण घेतले पाहिजे हे फक्त मानवाला उमगले आहे. यामध्ये मानव म्हणून स्त्रियांचा दर्जा उंचविण्यासाठी जे प्रयत्न झाले यामध्ये स्त्री शिक्षण महत्त्वाचे मानले जाते. भारतीय राज्यघटनेमध्ये स्त्री-पुरुष या दोघांना समान दर्जा देण्याचे नमूद केले आहे. स्त्री पुरुषाच्या दर्जामध्ये समानता आणण्यासाठी स्त्रियांचे शिक्षण प्रगत झाले. तेव्हा स्त्रियांचे शिक्षण पुरुषा सारखे असलेले पाहिजे हे मान्य करुन दोघांसाठी शिक्षण हे ज्ञान, ध्येय व सामर्थ्य याचा विकास करून राष्ट्राची संपत्ती व अनुत्पादक घटकातून निर्माण संवर्धित होईल अशी अपेक्षा व्यक्त केली. शिक्षण हे स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय पुनर्बांधणीसाठी असून स्त्रियांच्या विकासास गती मिळेल व देशाच्या विकासाचा पाया भक्कम होईल. एक शतके स्त्रियांना प्रत्येक घटकांमध्ये दुय्यम मानले गेले असले तरी स्त्रिया शिक्षण घेऊन आपल्या हक्कासाठी चळवळी करू लागल्या आहेत. आज स्त्रिया स्वतःची ओळख दुय्यम स्त्री म्हणून न ठेवता विविध क्षेत्रात अग्रेसर

ठरल्या आहेत. सेक्सी हे आज स्त्री यांनी घेतलेल्या शिक्षण प्रणालीतून दिसून येत असले तरी सुरुवातीच्या काळात शिक्षण हे विशिष्ट वर्गात पुरते मर्यादित होते पण शिक्षण हे विशिष्ट वर्गात पुरते न देता ते सर्व वर्ग व स्त्रिया पर्यंत पोहोचले पाहिजे यासाठी स्त्रियांना उच्च शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जात आहे. यासंदर्भात इत इ. स. 1978 मध्ये वर्ल्ड बँकेचे अध्यक्ष श्री मॅक नायारा यांच्यामते "जगातील प्रत्येक मुलीला घाला कारण मुलींना शिक्षण दिले तर लोकसंख्येत फरक पडेल. आरोग्यविषयक सवयी मध्ये फरक पडेल. प्रत्येक बाबतीत फरक पडेल. या विचारानुसार आज मुले शिक्षण घेत आहेत. महिलांना बारावीपर्यंत मोफत शिक्षण दिले जात आहे. हे मुलीच्या शिक्षणाचे प्रगती कारण लक्ष नसले तरी काही प्रमाणात क्रिया शिक्षणापासून वंचित राहत आहे याचे कारण शैक्षणिक खर्च परवडत नाही तसेच त्यांना विवाहास सामोरे जावे लागते.

जागतिकीकरणामुळे अनेक क्षेत्रात आमूलाग्र बदल होणे हे ओघानेच येते त्यास सुसंगत असे उच्च शिक्षण देणे क्रमप्राप्त असते. विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास होत आहे माहिती तंत्रज्ञानाच्या विविधतेमुळे उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट बनली आहेत. या बदलत्या उद्दिष्टानुसार आज स्त्री शिक्षणा पासून अलिप्त नाही. कारण बुद्धांक हा नवीन तंत्रज्ञानाच्या प्रगतीबरोबर बदलत आहे त्यामुळे स्त्री जैविक शास्त्र नुसार आपल्या उच्च शिक्षणात बुद्धांक टिकून आहे त्यामुळे "भारतामध्ये एकूण 300 विद्यापीठे आहेत त्या विद्यापीठांमध्ये एकूण 11 महिला कुलगुरू, 1 महिला प्र-कुलगुरू, 3 महिला रजिस्टार, 66 महिला डीन, 13 महिला डायरेक्टर आणि 12 महिला ग्रंथपाल आणि 5 महिला विद्यापीठांमध्ये 5 महिला कुलगुरु आहेत". या स्त्रिया उच्च शिक्षणाचे प्रतिनिधित्व करून उच्च शिक्षणातील व्यवस्थापनामध्ये दर्जा उंचावत आहे.

प्रिया उद्योजक महिला म्हणून ओळखल्या जातात. त्या नवनवीन तंत्रज्ञानाच्या शिक्षण घेऊन स्वतःचे उद्योग उभे केले आहेत. त्या उद्योगधंद्यातील व्यवस्थापन स्वतः पाहून तांत्रिक घटकानुसार औद्योगिक तत्त्वानुसार व्यावसायिक शिक्षणाच्या कार्यातून पार पाडीत आहेत. त्या उद्योजक महिला म्हणून आज नेतृत्व करीत आहेत म्हणजे समाजातील सामाजिक परिस्थिती व सामाजिक मन जाणून घेऊन सामाजिक विकासाचा पाया भक्कम करीत असला तरी उच्च शिक्षण घेणाऱ्या स्त्रियांमध्ये त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली अशा मुलींना उच्च शिक्षण घेतात पण आर्थिक परिस्थिती नसलेल्या फक्त कला व वाणिज्य शाखांमध्ये मोठ्या संख्येने प्रवेश घेतात. "अभियांत्रिकी व तांत्रिकी पदवी पाठ्यक्रमात साठी 100 मुलांमागे फक्त 6 मुली प्रवेश घेतात" यातून उच्च शिक्षणासाठी स्त्रियांचे प्रमाण कमी दिसून येते.

**राजकीय विकासातून सामाजिक विकास आणि लिंगभाव असमानता**

विसाव्या शतकाच्या स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता. "इंग्लंड आणि अमेरिका सारख्या प्रगत मानल्या जाणाऱ्या राष्ट्रात 1919 नंतर स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळायला सुरुवात झाली. स्वित्झर्लंड सारख्या प्रगत देशात 1970 मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार मिळाला. विसाव्या शतकात स्त्री स्वातंत्र्यवादी चळवळी सुरू झाल्याचे हे निदर्शक आहे. यानंतर अनेक राजकारणात स्त्रियांचा सहभाग वाढू लागला. डिसेंबर 1992 रोजी 73 व्या घटना दुरुस्तीचे विधेयक लोकसभेने राज्यसभेने मंजूर केले. 14 एप्रिल 1993 रोजी स्वाक्षरी घेऊन 74 वी घटना

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

दुरुस्ती अस्तित्वात आली. यामुळे स्त्रिया नाव पंचायत राज्य व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये ते 33 टक्के राजकीय अधिकाराची पदे मिळू लागली. या घटना दुरुस्ती मधील त्री आरक्षणामुळे महिलांना सरपंच, ग्रामपंचायत सदस्या, जिल्हा परिषद अध्यक्षा व सदस्या म्हणून सहभाग घेऊ लागल्या. स्त्रियांचे दैनंदिन कामकाज व अनुभवातून महिलांना अधिकारांची जाणीव होऊ लागली. यातून आपल्या गावातील समस्या सार्वजनिक शौचालयांची, आरोग्याची, पाण्याची सोय यासारखे स्त्रीजीवन असे संबंधित विषय मांडून त्यावर उपाययोजना करण्यासाठी धडपडू लागल्या. याबाबत सकारात्मक परिणाम दिसून येतात. त्यामुळे ग्रामीण स्त्रियांच्या राजकीय सहभागात मानसिक, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व नेते घटक कारणीभूत होऊ स्त्रियांचे राजकीय सक्षमीकरण होऊ लागले. पण वास्तवात मात्र स्त्रियांना स्वातंत्र्य आणि समानता मिळाली का ? असा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हा राजकीय हक्क मिळवून घटनात्मक प्रवेश करण्यासाठी स्त्रियांना खूप संघर्ष करावा लागला. महिलांना राजकीय कार्य कर्तुत्व दाखवण्यासाठी खूप कालावधीनंतर संधी मिळाली असली तरी स्त्रियांच्या कार्याचे मूल्यमापन लिंगावर असमानतेच्या चौकटीतच होत असते. स्त्रियांनी राजकीय विकासातील सामाजिक विकास साधला पाहिजे हे जरी खरे असले तरी समाजातील राजकारण हे विशिष्ट राजकीय नेत्यांच्या हाती असते हे वास्तव आहे. स्त्रियांना राजकीय आरक्षण मिळाले म्हणून स्त्रियांचा राजकारणातील सहभाग वाढत गेला पण आरक्षण हे तीर्थे असल्यामुळे स्त्रियांना राजकारणात दीर्घकाळ टिकू शकत नाही. तसेच त्यांना पुन्हा पुन्हा निवडून दिले जात नाही. निवडून आलेल्या स्त्रिया हा या पदावर असतात त्या पदाला अनुसरून या जगात समाजाचा प्रश्नासाठी जगू लागतात तेव्हा त्यांना राजकीय नेते पुरुष किंवा कुटुंबातील पुरुष के "तुम्हाला राजकारणातील व समाजकारणातील काहीही करत नाही असे सांगून केवळ त्यांना रबरी शिक्क्याचे कार्य करण्यास भाग पाडतात त्यामुळे स्त्रियांचे राजकारणातून सामाजिक विकास साधायचा म्हंटले तरी त्यांच्याकडे लिंगभाव दृष्टिकोनातून पाहिले जाते". स्थानिक स्वराज्य या संस्थेतील बहुतेक स्त्रियांना पुरुषांच्या उपस्थित बोलणे हे अयोग्य समजले जात अशा ठिकाणी केवळ अशिक्षित व कमी शिक्षण घेतलेल्या स्त्रियांना नेतृत्व देऊन त्या लिंगभाव भेदाच्या शिकार होतात. याचे उदाहरण द्यायचे म्हटले तर "गाला चेतना यांनी सातारा जिल्ह्यातील 'इंदोली व पळशी' या दोन गावातील ग्रामपंचायतीसाठी उभ्या केलेल्या स्त्री पॅनलचा अभ्यास केला आला अभ्यासातून असे दिसून आले की, या दोन्ही गावात या स्त्री पॅनेला विरोध होता या विरोधातून स्त्रियांना धमकी, दहशतीला सामोरे जावे लागले. तसेच एका विधानाची ही वाच्यता होत होती तेरी धान म्हणजे ' चूल नीट सांभाळता येत नाही आणि निघाल्या राजकारण करायला."

तेव्हा राजकीय व्यवस्थेतून सामाजिक विकास करायचा म्हटले तरी आजही स्त्रियांना राजकीय जीवनात अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते तसेच क्रिया सामाजिक प्रश्न जेव्हा हाताळू लागल्या तेव्हा त्यांच्यावर अन्याय व अत्याचार होऊ लागल्या त्याचप्रमाणे राजकीय व्यवस्थेतून आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासाचे धोरण ठरवत असताना राजकीय पक्षातील पुरुष नेते हे राजकीय स्त्रियांना यातून अलिप्त ही ठेवत असतात.

Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language

**सामाजिक व सांस्कृतिक घटकातून लिंगभाव असमानता व सामाजिक विकास**

सामाजिक विकासामध्ये स्त्रियांचा सहभाग आहे असे म्हणले तर सामाजिक विकास ही संकल्पना व्यापक आहे त्यामुळे आर्थिक, शैक्षणिक, राजकीय या घटकांमुळे लिंग भाव असमानता हे सामाजिक विकासात अडथळा निर्माण करणारी ठरते. भारतीय समाजाने लोकशाही जीवन पद्धतीचा स्वीकार केला असला तरी पुरुषप्रधान संस्कृतीला छेद देणारी आहे कारण पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान आहे व पुरुषांना सामाजिक व सांस्कृतिक जीवनाचे शिल्पकार समजले जाते. भारतीय राज्य घटनेने प्रत्येकाला माणूस म्हणून जगण्याचे सर्व अधिकार दिले असले तरी प्रत्येकाला स्वतःचे तत्व पण आपले व्यक्तिमत्त्व विकसित करण्याची संधी दिली आहे. कोणालाही दुय्यम मानू नये कोणावर अन्याय होऊ नये याकरिता कायद्यावर आधारलेले समाजव्यवस्था आहे. पण कुटुंब, जात, धर्म, नातेसंबंध व समाज यामध्ये स्त्री व पुरुष गुंतलेले असल्याने सांस्कृतिक प्रक्रिया या आणि संरचना यामुळे स्त्रियांची दुय्यम काही लिंगभाव दृष्टीने पाहिले जाते. धर्म, कुटुंब, जात व समाज या दृष्टीने विचार केला तर सामाजिक विकासामध्ये हे घटक अडथळे आणणारे आहेत.

**लिंगभाव आणि कुटुंब**

कुटुंब हे पुरुष सत्ता व्यवस्थेवर आधारित आहे. कुटुंबातून समाजाचे प्रतिबिंब दिसत असते. तेव्हा प्रत्येक जातीची विशिष्ट अशी संस्कृती असते. त्यातून त्या जातीतील सदस्यांना स्वतःची ओळख प्राप्त असते. ही ओळख, जातीतील स्त्री, परंपरा, प्रथा यातून होत असल्यामुळे कुटुंबातील नातेवाईकांच्या जाळ्या पासून प्राप्त झालेली असते. कुटुंबामध्ये स्त्रियांचे समाजीकरण हे लिंग भावानुसार घडत असते. त्यांनी कुटुंबात आपल्या जातीनुसार कोण कोणत्या घटकांशी व्यवहार करावा, धार्मिक वृत्ते कोणती करावीत व कोणती करू नयेत शुद्धता या बाबतीत कर्मकांडे ही स्त्रियांनी आपल्या जातीनुसार करावित. "जातींच्या नियमांप्रमाणे घर आणि बाहेरचे जग यांच्यात फरक केलेल्या आढळून येतो. घराचे शुद्धता पवित्र राखण्याच्या कामी क्रिया फार महत्त्वाची भूमिका बजावतात" पुणे जाती व्यवस्थेनुसार संरचना विकसित होऊन त्या जातीचे कुटुंब असेल तर त्याचा तिच्या कुटुंबातील व्यक्तीशी विवाह होत असतो. त्यामुळे लिंग भावानुसार पावित्र्याची जोड देऊन तिने त्या कुटुंबाचे पावित्र्य राखले पाहिजे म्हणून, "मिलेटच्या मते, पुरुषसत्ताक व्यवस्थेची प्रमुख संस्था म्हणजे कुटुंब होय. व्यापक समाजाचा तो अर्धा असतो आणि व्यक्तींना त्याच्याशी जोडल्या जातील कुटुंबव्यवस्था ही नियंत्रण आणि किती वादी पणा यावर पक्का ठसा उमटविणे" यावरून लिंगभावाच्या भिन्नत्वाच्या भुमिका नुसार कुटुंबांमध्ये जातीतून नियंत्रण व भूमिका तयार केल्या जातात. तसेच समाज शास्त्रीय दृष्ट्या विचार केला तर कुटुंब ही सामाजिक संस्था आहे. त्यामुळे स्त्री ही जैविक दृष्ट्या पुनरुत्पादनाच्या वास्तव आहे. समाजाचे सातत्य टिकवण्याचे कार्य ही स्त्रीच करते पण पुरुष हा समाजामध्ये पितृत्व व अधिकार गाजवणारा आहे. तेव्हा पुरुषसत्ताक व्यवस्थेमध्ये स्त्रीला जाती सदृश्य जो दर्जा मिळतो तो दर्जा लिंग भावानुसार ठरतो तेव्हा त्या जातीनुसार कुटुंबही घडते. जीवशास्त्रीय विचार केला तर कुटुंब आहे जाती विषमतेचे केंद्र आहे. कारण प्रत्येक व्यक्तीच्या सामाजिक करणाची सुरुवात ही कुटुंबातून होत असते ते सामाजीकरण हे त्या त्या जातीच्या

चौकटीत केले जाते ते कॉलिंग भावानुसार कुटुंबाचा विचार केला तर जात आणि जातीचा गट व्यवहार करताना कुटुंबातील नातेसंबंधाच्या चौकटीतच राहते.

**निष्कर्ष**

1. सामाजिक विकासात लिंगभाव असमानतेचा विचार केला तर लिंगभाव हानी करीत नसून तो सामाजिक व सांस्कृतिक आहे. समाज विकास प्रक्रियेमध्ये स्त्रियांचे भेद हे लिंग भावानुसार असून ते समाज निर्मित आहे.

2. विकासाची मुळे मूठभर लोकांच्या हाती आहे. समाज विकास हे स्त्रियांच्या प्रगतीचा विषय असला तरी बहुसंख्य स्त्रियांचे विकासाबाबत विदारक सत्य समाजासमोर येते ते म्हणजे लिंगभाव असमानतेतूनच.

3. सामाजिक विकास हा आर्थिक विकास अंशी संबंधित असला तरी सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ पाहिले तर विषमतेचे मूळ हे सामाजिक लिंग भावानुसार आहे म्हणून आर्थिक विकासात आणि सामाजिक विकास साधायचा असेल तर आज हे लिंगभाव समानता प्रस्थापित करणे गरजेचे आहे, तरच आपण सामाजिक विकासाचे उद्दिष्ट चांगल्या पद्धतीने गाठू शकू.

4. स्त्रियांच्या विकासावरच समाजाचा विकास अवलंबून आहे यासाठी शिक्षणात प्रक्रियेत सहभाग असावा यासाठी जरी प्रयत्न झाला असला तरी शिक्षणामध्ये मुलींच्या वाटचाली कमी होती याचे कारणे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक दिसून येतात हे लिंगभाव असमानतेतून.

5. स्त्रियांना राजकीय सत्तेत घटनात्मक प्रवेश मिळाला असला तरी स्त्रियांना आपले राजकीय कार्य कर्तुत्व दाखविण्यासाठी संघर्ष हा करावा लागतो हा संघर्ष कार्याचे मूल्यमापन हे लिंग भाव समानतेच्या चौकटीत दिसून येते.

6. भारतामध्ये धर्मानुसार चार वर्ण आहेत या वर्णनानुसार व जातीनुसार स्त्री व पुरुषांचा आमची खर्चा ठरवला आहे. कोणत्याही वर्णनानुसार व जातीनुसार विचार केला तर लिंगभाव असमानतानुसार स्त्रीची ओळख ही श्रेष्ठ ठरतात ती कनिष्ठ ठरत आहे.

7. जातीनुसार लिंगभेदाचा करून स्त्री-पुरुष यांच्या हक्कातील बैलाचे सर्वाधिक कुटुंबातच होत असल्यामुळे जातीय विषमतेचे स्वरूपही भयानक आहे.

**सारांश**

आज स्त्रिया विकासाच्या प्रक्रियेत अग्रेसर आहेत स्त्रिया आणि विकास या बाबतची धोरणे अमलात आणली जात आहेत पण सामाजिक विकासाचा स्त्रियांच्या घटकांवर दुर्लक्ष होत आहे. समाजाचा बारकाईने विचार केला तर आज हे पुरुष आत्मक पद्धतीत समाज गुरफटला आहे त्यामुळे समाजातील पुरुष हे स्त्रियांच्या कडे पाहताना लिंगभाव व समानतेच्या दृष्टीने पाहत असतात. आजही सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक दृष्टिकोनाचा विचार करताना सामाजिक विकासाचे घटक अभिप्रेत आहे कारण या घटकांचा विकास हा स्त्री-पुरुषांना समान तिकडे येणार आहे पुरुषप्रधान समाजात व विकासाच्या प्रक्रियेत मूलगामी परिवर्तन होत असले तरी विकासाच्या कार्याचे मूल्यमापन समता पूर्व न होता लिंग भागातून होत असतो तेव्हा सामाजिक विकास साधायचा असेल तर लिंगभाव असमानतेची वाटचाल न करता समानतेतून सकारात्मक बदल घडवून आणले पाहिजेत.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Humanity Science & English Language*